IMPACT FACTOR SJIF 2019-6.380 ISSN 2319-4766

SRJIS

# GLOBALIZATION & ITS IMPACT ON INDIAN ECONOMY (GIIE 2020)

Special Issue of
An International, Peer Reviewed & Referred


## SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

JAN-MAR,2020,V-8/45

**Editor-In-Chief**
Prin. Dr. G. N. Shinde

**Editor**
Dr. P. R. Muthe

**Co-Editors**
Dr. D. D. Bhosale
Dr. D. A. Pupalwad



# जगतिकीकरणाचा पर्यटन क्षेत्रावरील परिणाम

**प्रा. डॉ.माधवराव नरसिंगराव बिरादार**

*सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, दिगंबरराव बिंदू महाविद्यालय, भोकर जि.नांदेड*

**प्रस्तावना :–**

मनूष्य हा भ्रमणशील प्राणी आहे. प्राचीन काळापासून मानव प्रवास करीत आला आहे. या प्रवासाच्या आवडीमुळे कोलंबसने अमेरिकेचा शोध लावला. त्याकाळी प्रवास ही संकल्पना संकूचित होती. प्रवासाचा उद्देश नवीन प्रदेशाचा शोध घेणे, व्यापार करणे, व धार्मिक स्थळांना भेट देणे हा होता. मध्ययूगात प्रवासाच्या पध्दतीत बदल झाले. आनंद मिळविण्यासाठी, मनोरंजनासाठी प्रवास ही संकल्पना प्रथम युरोपातील रोमन लोकांनी रुजविली. रोमन साम्राज्याच्या काळात तेथील लोक इजिप्तमधील पिरॅमिड, ग्रीसमधील अथेन्स व स्मार्टा या नगरांची भव्य नगर रचना, तेथील देव—देवतांची मंदीरे, मूर्ती, तेथील क्रीडांगणे पाहण्यासाठी जात. पुढे युरोपमधील पुनरुज्जीवनामुळे जगभरातील वसाहतीचा व साम्राज्याचा विस्तार, औद्योगिक क्रांती व यातून युरोपमधून सुरु झालेला संपत्तीचा ओघ यामूळे तेथे पर्यटन ही श्रीमतांची मक्तेदारी न राहता मध्यमवर्ग सुध्दा पर्यटनात सहभागी झाला. युरोपियन पर्यटकांनी आधूनिक पर्यटनाचा पाया घातला.

आधूनिक काळात पर्यटन हा एक स्वतंत्र राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय उद्योग म्हणून विकसित झाल्याचे दिसून येते. देशातील व परदेशातील पूरातत्ववास्तू, इतिहासप्रसिध्द व निसर्गरम्य स्थळे, प्राचीन कलानिर्मितीची केंद्रे, पवित्र तीर्थक्षेत्रे प्रचंड औद्योगिक व इतर प्रकल्प इत्यादीचे आकर्षण ही पर्यटनामागील मूख्य प्रेरणा आहे. ही प्रेरणा सार्वत्रिक व सर्वकालीन असली तरी आधूनिक काळात ज्ञानप्रसाराची व दळणवळणाची सूलभ साधने विकसित झाल्याने आधूनिक पर्यटन उद्योगास विशेष चालना मिळाली. निसर्गनिर्मित व मानवनिर्मित रम्य व भव्य असे इहलोकीचे जे सौंदर्य आहे त्याची खास आस्था हा आधूनिक मानवाचा धर्म आहे. ते सौंदर्य सर्वासाठी आहे अशी ही आधूनिक, माणसाची धारणा आहे पर्यटनामागील आधूनिक मानवाची प्रेरणा वरील भूमिकेचा निर्वाळा देते.

विविधतेने नटलेल्या भारत देशाचे भौगोलीक व्यक्तिमत्व पर्यटन व्यवसायासाठी फार अनूकूल आहे. त्यासाठी खूप वाव आहे. भारताचा इतिहास मानवी मनाला भूरळ पाडणारा आहे. प्राकृतिक विविधतेबरोबरच लोकजिवन, कला, संस्कृती या बाबतही विविधता आहे. सूंदर हिमाच्छादीत पर्वतशिखरे, धबधबे, सूंदर किनारे, राष्ट्रीय उद्याने, विविध पशू—पक्षी, पवित्र धार्मिकस्थळे पर्यटकासाठी आकर्षित करतात. तसेच भारताला वास्तूकला, शिल्पकला यांचा संपन्न व प्रदीर्घ वारसा लाभला आहे. जगप्रसिध्द ताजमहल, अंजिठा—वेरुळ लेणी समूह, खजूराहो, कोणार्क येथील वास्तूकला व शिल्पे प्रसिध्द आहेत. चित्रकला, हस्तकला, लोककला विशेष आहेत. नृत्य व संगीत ही भारतीय सांस्कृतिक व धार्मिक जीवनाची अविभाज्य अंगे आहेत. कथ्थक, भरतनाटयम, कथकली, कूचीपूडी, ओडीसी, मनीपूरी असे नृत्यप्रकार जगप्रसिध्द आहेत. भारतीय संगीतकला अनेकांनी अजरामर केली आहेत. म्हणूनच भारताला पर्यटकाचे नदंनवन असे म्हणतात. या विविध नैसर्गिक, ऐतिहासीक, सांस्कृतिक घटकाच्या विविधमूळे हजारो पर्यटन स्थळे निर्माण झालेली आहेत.

आधूनिक पर्यटन व्यवसायाचे आर्थिक, लाभ पाश्चात्य विकसित देशानी यापूर्वीच

उठवले असले तरी आपल्या देशात मात्र या शतकाच्या सहाव्या दशकात या व्यवसायाला सुरुवात झाली. भारतात पर्यटनाचा अधिकाधिक विकास व्हावा म्हणून देशात तसेच परदेशात पर्यटन कार्यालये उघडण्यात आली. देशात सर्वप्रथम दिल्ली, कोलकात्ता, मूंबई व चेन्नई येथे प्रादेशिक पर्यटन कार्यालये सुरु करण्यात आली. नंतरच्या काळात त्याची सूसंगत साखळी असावी म्हणून १९५५ मध्ये आणखी महत्वाच्या ठिकाणी पर्यटन कार्यालये उभारण्यात आली. भारतामध्ये विविध परदेशी पर्यटक आकृष्ट व्हावे यासाठी परदेशात देखील पर्यटन कार्यालये उघडण्यात आली. डिसेंबर १९५२ मध्ये न्यूयार्क, जुलै १९५५ मध्ये लंडन, फेब्रुवारी १९५६ मध्ये पॅरीस (फ्रान्स) तर सप्टेंबर १९५६ मध्ये फ्रंकफ्रुट (जर्मनी) येथे कार्यालये सुरु करण्यात आले. अशाच प्रकारे आस्ट्रेलिया, न्यूझीलंड व श्रीलंकेतून पर्यटकाना आकृष्ट करण्यासाठी सप्टेंबर १९५६ मध्ये मेलबॉर्न व कोलंबो येथे कार्यालये सुरु करण्यात आले. भारतात येणाऱ्या विदेशी पर्यटकांची माहिती पूरविणे, परदेशात पर्यटक विषयक जाहिराती करणे, मध्यवर्ती पर्यटन विभागाला अद्यावत माहिती पूरविणे ही कामे परदेशातील कार्यालयावर सोपविण्यात आली.

भारतात १ मार्च १९५८ रोजी पर्यटन उद्योगाच्या सर्व बाबीकडे लक्ष देता यावे म्हणून वाहतूक मंत्रालयात पर्यटनासाठी एक वेगळे खाते सुरु करण्यात आले. तर १९६६ मध्ये भारतीय पर्यटन विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. भारताच्या राष्ट्रपतीच्या १४ मार्च १९६७ च्या आदेशानुसार भारतात स्वतंत्र पर्यटन व नागरी हवाई वाहतूक विभागाची स्थापना करण्यात आली. या विभागामूळे पर्यटन विकासास चालना मिळाली. या विभागासाठी स्वतंत्र मंत्रालये निर्माण करण्यात आले ज्याचा संपूर्ण कारभार एका पूर्णवेळ मंत्र्याकडे सोपविण्यात आला.

**जागतिकीकरण आणि भारत**

भारतात १९९०च्या सूमारास जागतिकीकरणाला सुरुवात झाली. हया काळात देशावरचे विदेशी कर्ज एवढे वाढले होते की, जागतिक बॅंक आणि आंतरराष्ट्रीय नाणे निधी हया खाजगी जागतिक संघटनांनी भारताला आणखी कर्ज देणे नाकारले व कर्ज मिळविण्यासाठी भारतावर काही अटी लादल्या. हया अटीमध्ये भारताने आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये काही धोरणात्मक बदल करुन तिला विदेशी कंपन्यासाठी खूला करणे समाविष्ट होते. अर्थव्यवस्थेमधील हया बदलाना आर्थिक सुधारणा म्हटले गेले व त्यात जागतिकीकरणा सोबतच उदारीकरण व खाजगीकरण हयांचा पण समावेश होतो. हयांनाच एकत्रितपणे 'खाऊजा' धोरण असे संबोधले जाते.

जागतिकीकरण म्हणजे देशाच्या अर्थव्यवस्थेचे जगाच्या अर्थव्यवस्थेबरोबर एकत्रिकरण करणे होय. विसाव्या शतकाच्या शब्दकोशानुसार जागतिकीकरण म्हणजे जगभर पसरणे, एकाचवेळी संपूर्ण जगाचा किंवा जागतिक सर्व लोकांचा विचार करणे त्यात व्यापार, विदेश भेट, गुंतवणूक, भांडवल प्रवाह, प्रवास आणि तंत्रज्ञान यांच्या परस्पराच्या माध्यमाने राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेसाठी खूले केले जाते. जागतिक बॅंकेच्या अहवालानुसार जागतिकीकरण म्हणजे (अ) उपयोग्य वस्तूसह सर्व वस्तूच्या आयातीवरील नियंत्रण हळूहळू समाप्त करणे (ब) आयात शुल्काचा दर कमी करणे आणि (क) सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण करणे होय. जागतिकीकरण हे संपूर्ण जगाची एका मोठया बाजारपेठेत रुपांतरीत होण्याची प्रक्रीया होय. वस्तू आणि सेवा तसेच भांडवल आणि श्रम यांच्या व्यापारावरील निर्बंध उठवून जागतिक पातळीवर व्यापार मुक्तपणे घडवून येण्याची प्रक्रीया यात सामावलेली आहे. थोडक्यात देशात खूला व्यापार, गुंतवणूकीची

ISSN: 2319-4766

मोकळी बाजारपेठ आणि तंत्रज्ञान व कुशल व्यावसायीकानं देशातंर करण्यास सुलभ कायदे कानून अशी व्यवस्था म्हणजे जागतिकीकरण होय.

**जागतिकीकरणाचा पर्यटनावरील परिणाम**

आजच्या जागतिकीकरणाच्या काळात पर्यटन देशातील एक प्रमुख आर्थिक व्यवसाय म्हणून तो मान्य झाला आहे. पर्यटन हा सध्या जगातला सर्वात वेगाने वाढणारा व्यवसाय आहे. जगातील कांही देशाची तर बहुतांशी अर्थव्यवस्थाच तेथील पर्यटनावर अवलंबून आहे. आधूनिक पर्यटन व्यवसाय वाढण्याचे महत्वाचे कारण म्हणजे अ) जगातील विकसित देशात विशेषत: पश्चिम युरोपीयन व उत्तर अमेरिकन देशात या व्यवसायात मोठया प्रमाणावर लोकांना व्यवसाय उपलब्ध झाला. ब) जगातिल अविकसित देशाच्या अर्थव्यवस्थेतही या व्यवसायाचा महत्वाचा सहभाग आहे आणि क) या व्यवसायामुळे अनेकांना डॉलरसारखे आंतरराष्ट्रीय चलन उपलब्ध होते भारतासारख्या विकसनशिल देशातील पर्यटन ही गेल्या दोन दशकात २५ ते ३० टक्क्यांनी वाढला आहे आणि त्यामूळे मिळणाऱ्या परकीय चलनात मोठया प्रमाणात वाढ झाली आहे. भारतामध्ये येणाऱ्या विदेशी पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे त्यामूळे पर्यटन विकासासाठी भारतात व भारताबाहेर पर्यटन कार्यालये स्थापन करण्यात आलेली आहेत. पर्यटनाचे स्वतंत्र मंत्रालय, भारतीय पर्यटन विकास महामंडळ, हॉटिल्स व इतर सुविधेमध्ये झालेली वाढ, सुनियोजीत प्रसिध्दी व जाहीरात यामूळे पर्यटन क्षेत्रात वाढ होऊन सेवा क्षेत्र वाढत आहे.

**पर्यटन संख्येत वाढ :—**

भारतातील वैशिष्ट्यपूर्ण पर्यटन केंद्रातून भारतात येणाऱ्या परदेशी पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. २०१७—१८ मध्ये आलेल्या परदेशी पर्यटकाच्या पहिल्या दहा देशामध्ये पुढील देशांचा समावेश आहे.

| अ.क्र. | देशांची नांवे | परदेशी पर्यटकांची संख्या |
|---|---|---|
| १ | बांगलादेश | २५५६६७५ |
| २ | यु.एस. | १४५६६७८ |
| ३ | युनायटेड किंगडम | १०२९७५६ |
| ४ | श्रीलंका | ३५३६८४ |
| ५ | कॅनडा | ३५१०४० |
| ६ | ऑस्ट्रेलिया | ३४६४८६ |
| ७ | मलेशिया | ३१९१७२ |
| ८ | चिन | २८१७६८ |
| ९ | जर्मनी | २७४०८७ |
| १० | रशीया | २६२३०९ |
| दहा देशांची एकुण संख्या | | ६९३१६५७ |
| इतर देशातील पर्यटक | | ३६२६२७२ |
| एकूण पर्यटक | | १०५५७९२९ |

**परकीय चलनाची प्राप्ती:—** पर्यटनासाठी अनेक विदेशी पर्यटक येतात व त्यामूळे देशाला मोठया प्रमाणात परकीय प्राप्त होते. आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी येते. भारतातील वैशिष्ट्यपूर्ण पर्यटन केंद्रामूळे प्रतिवर्षी येणाऱ्या परदेशी पर्यटकाच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्याने देशाला मिळणाऱ्या परदेशी चलनामध्ये सातत्याने वाढ होत आहे. जागतिकीकरणा पूर्वी भारतात येणाऱ्या पर्यटकाची संख्या कमी होती. कारण देशातील पर्यटन व्यवसायाचा फारसा विकास झाला नव्हता. गेल्या तिन दशकात मात्र भारतात येणाऱ्या परदेशी पर्यटकाच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. सन २००१ ते २०१८ या कालावधीत भारतात आलेल्या विदेशी पर्यटकाची संख्या व त्यातून मिळणाऱ्या परदेशी चलनातील मिळकत पुढील तक्त्यात दर्शविली आहे.

ISSN: 2319-4766

| वर्ष | परदेशी पर्यटकांची संख्या (मिलियन) | मिळालेले परकीय चलन (मिलियन डॉलर) |
|---|---|---|
| २००१ | २.५४ | ३१९८ |
| २००२ | २.३८ | ३१०३ |
| २००३ | २.७३ | ४४६३ |
| २००४ | ३.४६ | ६१७० |
| २००५ | ३.९२ | ७४९३ |
| २००६ | ४.४५ | ८६३४ |
| २००७ | ५.०८ | १०७२९ |
| २००८ | ५.२८ | ११८३२ |
| २००९ | ५.१७ | ११९३६ |
| २०१० | ५.७८ | १४४९० |
| २०११ | ६.३१ | १७७०७ |
| २०१२ | ६.५६ | १७९७१ |
| २०१३ | ६.९७ | १८३९७ |
| २०१४ | ७.६८ | १९७०० |
| २०१५ | ८.०३ | २१०१३ |
| २०१६ | ८.८० | २२९२३ |
| २०१७ | १०.०४ | २७३१० |
| २०१८ | १०.५६ | २८५८५ |

आधार : Indian Tourism Statistics at a Glance 2019 Ministry of Tourism. Govt. of India

वरील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे सन २००१ मध्ये परदेशी पर्यटकाची संख्या २.५४ मिलियन होती. २०१८ मध्ये ती १०.५६ मिलियन पर्यत वाढलेली आहे. सन २०१७–१८ मध्ये आलेल्या परदेशी पर्यटकांच्या पहिल्या दहा देशामध्ये बांगलादेश, युएसए, युके, श्रीलंका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, चिन, जर्मनी, रशीया या देशाचा क्रमांक होता. याशिवाय अनेक इतर देशातील पर्यटकही मोठया संख्येने भारतात येतात. त्यामूळे देशाला मोठया प्रमाणावर परकीय चलनाची प्राप्ती होत आहे. सन २००१ मध्ये देशाला पर्यटनाच्या माध्यमातून मिळणारे परकीय चलन ३१९८ मिलियन डॉलर इतकी होते. ते २०१८ मध्ये मिळालेले परकीय चलन २८५८५ मिलियन डॉलर पर्यत वाढलेले आहे. देशातील पर्यटनातून परकीय चलनाची कमाई होत असल्यामुळे गंगाजळीत भक्कम भर पडत आहे.

**रोजगार उपलब्धता :–** पर्यटन हा एक महत्वाचा आर्थिक व्यवसाय आहे आणि हा श्रमप्रधान सेवा स्वरूपाचा उद्योग असल्यामूळे मोठया प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देणारा एक महत्वाचा व्यवसाय आहे. भारतामध्ये मोठया संख्येने श्रमिकांची उपलब्धता असल्यामूळे पर्यटन उद्योगाचा विकास बेकारी व अर्धरोजगारी या समस्येचे कांही प्रमाणात निराकरण होऊ शकते. पर्यटनाच्या माध्यमातून लहानापासून ते वृध्दांपर्यत, श्रीमंतापासून ते गरीबापर्यत, स्त्रिया, पुरुष, निरक्षर, साक्षर, यासर्वांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो. पर्यटन स्थळी छोटे–मोठे व्यवसाय करणारे व्यावसायिक यात हॉटेल व्यवसाय ते किरकोळ विक्रेते यात फोटाग्राफर, खेळणी विक्रेता, सौंदर्यप्रसाधने दूकाने, आयूर्वेदीक औषधविक्रेता, लिंबूशरबत, नारळ, नारळपाणी, फूल विक्रेता इत्यादींना रोजगार मिळण्याची संधी उपलब्ध झाली आहे. तसेच पर्यटन प्रतिनिधी, सहल संयोजक, मार्गदर्शक व वाटाडया, स्वागतकार, जाहिरातदार, मनोरंजनात्मक खेळ, वॉटर स्पोटर्स, बोटींग धार्मिक स्थळी दूकाने, माळीकाम, बागकाम, सफाई कामगार, सुरक्षारक्षक विविध खाद्यपदार्थ विक्रेते अशा विभिन्न व्यवसायाची निर्मिती झालेली आहे. व्यावसायीक स्वत:च्या व कुटुंबाचा उदरनिर्वाह या पर्यटन व्यवसायातून चालवत असल्याचे दिसून येते. त्यामूळे देशातील बेरोजगारीची समस्या काही प्रमाणात दूर करण्यास पर्यटन उद्योग महत्वाचा ठरला आहे. पर्यटनातून अनेक क्षेत्रात रोजगार निर्माण झाला आहे. उदा. वाहतूकीमध्ये रस्ते वाहतूक, रिक्षा चालक, टॅक्सीचालक, रेल्वे वाहतूक, हवाई वाहतूक, हॉटेल व्यवसाय, शेती व्यवसाय (कृषी पर्यटन)

इतर पर्यटन संस्था अशा अर्थव्यवस्थेच्या अनेक क्षेत्रात पर्यटन उद्योगामूळे रोजगार उपलब्ध झाला आहे.

**उत्पन्नात वाढ** :— पर्यटनामूळे जो प्रत्यक्ष पैसा मिळतो त्याहीपेक्षा राष्ट्रीय उत्पन्नातील गुणक परिणामामूळे जी भर पडते किंवा पर्यटक खर्चाच्या उलाढालीमूळे निर्माण होणाऱ्या पैशाची जी भर पडते तिचे महत्व अधिक असते. अर्थशास्त्रज्ञाने पर्यटकाला गुणक परिणाम भारताच्या बाबतीत ३.५ एवढा काढला आहे. सोप्या शब्दात सांगायचे तर एका पर्यटकाचा एक रुपया खर्च झाल्यास त्यायोगे अर्थव्यवस्थेमध्ये ३.५ रुपये किंमतीची उलाढाल होते. पर्यटकाचा प्रवास काळात मोठया प्रमाणात खर्च होतो. उदा. पर्यटक पर्यटन स्थळी, मुख्यत: प्रवास खर्च, निवास खर्च, अन्न खर्च, मनोरंजन खर्च, बोटींग, वॉटर स्पोटर्स, खरेदी खर्च, रत्न अलंकार हॅडबॅग, सौंदर्य प्रसाधने, कपडे, सुगंधी वस्तू, भेट वस्तू, माहिती पूस्तके, कलाकौशल्य वस्तू, इलेक्ट्रॉनिक वस्तू, खेळण्या, घरगूती उपयोगाच्या वस्तू, पर्यटनस्थळी खासियत असलेल्या वस्तू, इलेक्ट्रॉनिक वस्तू, खाद्य पदार्थ, हॉटेल खर्च अशा व इतर अनेक वस्तूच्या खरेदीवर मोठया प्रमाणात खर्च करतात. पर्यटकाच्या या विविध खर्चाचे स्वरुप म्हणजेच पर्यटन स्थळी विविध प्रकारच्या वस्तूची मागणी होते. त्यामूळे तेथे अनेक उद्योग, व्यवसायाचा विकास होऊन त्यातून उत्पादनाचे प्रमाण वाढत आहे. त्यामूळे देशातील लोकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ होत आहे.

**सारांश** :—

जागतिकीकरणामुळे देशात दिवसेंदिवस येणाऱ्या पर्यटकाच्या संख्येत वाढ होत आहे त्यामूळे तेथील सेवा व सुविधा पर्यटकांना उपलब्ध व्हाव्यात याकरींता बाहय सरंचनेच्या विकासाकरीता शासनाकडून गुंतवणूक करण्यात येत आहे. पर्यटन स्थळी पिण्याचे पाणी, प्रवासासाठी चांगल्या दर्जाची रस्ते, प्रवास सुविधा, वीजपूरवठा या आधारभूत घटकाची उपलब्धता करण्यासाठी शासनाकडून खर्च केला जात आहे. त्यामूळे पर्यटनस्थळी उत्पन्न व रोजगारात वाढ होताना दिसून येत आहे. पर्यटन स्थळा कडून शासनास ही उत्पन्न मिळते. पर्यटन उद्योगामूळे अर्थव्यवस्थेतील आर्थिक विकास, रोजगार निर्मिती, विविध व्यवसायाची व उद्योगाची स्थापना, औद्योगिकरण, गरीबी निर्मूलनास सहाय्य, मूलभूत सूविधांचा विकास, बाजारपेठांचा विकास, शासकीय उत्पन्नात वाढ अशा एकंदर अर्थव्यवस्थेतील महत्वपूर्ण आर्थिक घटकावर अनूकूल अशा परिणाम होत आहे. म्हणून अर्थव्यवस्थेत पर्यटन उद्योग महत्वपूर्ण ठरला आहे.

**संदर्भ** :—


१. *शिंदे एम.बी. (२००६) पर्यटन भुगोल, फडके प्रकाशन कोल्हापूर.*
२. *खतीब के.ए. (२००६) पर्यटन भुगोल, मेहता पब्लिशिंग हाऊस पूणे.*
३. *भोसले यशोधरा (२००५) प्रवास पर्यटनामध्ये नवे पैलू मेहता पब्लिशिंग हाऊस पूणे.*
४. *धारपूरे विठ्ठल (२००१) पर्यटन भुगोल, पिंपळापूरे अॅन्ड कं.पब्लिशर्स नागपूर.*
५. *भाटीया ए.के. (२००६) द बिझनेस ऑफ टूरिझम कनसेटटस अॅन्ड स्ट्रॅटेजिग स्टार्लिग पब्लिशर्स प्रा.लि.न्यू दिल्ली.*
६. *सिंह बी.पी. आणि सिंह सूमंत, पर्यावरणीय विभिन्नताचे (पर्यटन शोध परीयोजना), यूजीसी क्षेत्रीय कार्यालय भोपाळ.*
७. *नागताडे व पारधी (२००६) पर्यटन भूगोल प्रकाशन नागपूर*